**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**

**दैनंदिन प्रेस नोट दि.०६/०१/२०१८**

**दि.०५/०१/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ०६/१८,भादविक ३०७,५०४,महा.पो.क. ३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | बल्लुसिंग प्रभुसिंग टाक,वय २८ वर्ष,रा.रामटेकडी हडपसर,पुणे |
| **आरोपी** | सनीसिंग पापासिंग दुधानी,रा.बिराजदार नगर,हडपसर,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०१/२०१८ रोजी ००/५० वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतीक भवन रामटेकडी हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम सनसिंग दुधानी याने जुन्या भांडणाचे कारणावरुन तिलकसिंग गब्बरसिंग टाक,वय-२६ वर्ष,रा.स.नं.१०८/१०९,रामटेकडी हडपसर,पुणे यास शिवीगाळ करुन त्याच्या जवळ असलेल्या चाकुने तिलकसिंग याचे डाव्या बाजुचे छातीवर व डाव्या मांडीवर वार करुन त्यांस गंभीर जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.पी.बागुल |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे १२/१८,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट ११९/१७७ |
| **फिर्यादी** | तुकाराम जाधव,वय-२५ वर्षे,रा.मुं.पो.वडगाव भाडे,ता.दौड,जि.पुणे |
| **आरोपी** | अशोक एकनाथ बाबर,वय-३९ वर्षे,रा.नगर रोड,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०१/२००१८ रोजी १२/१५ वा. आगाखाना पॅलेस पुढे मातृछाया सोसायटीचे गेट समोर |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील बस ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी मोटार सायकलस्वार अनिल जयकृष्ण ओझा,वय-२८,रा.साईनिवास,आपले घर सोसायटी,खराडी,पुणे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता, अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. जी.जी.मोरे ९५२७००३२२८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भोसरी पो स्टे ०६/१८,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | मधुकर कुळधरण,वय-५० वर्षे,रा.आदर्शनगर, मोशी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०१/२०१८ रोजी १८/०० वा. ते दि.०५/०१/२०१८ रोजी सकाळी १०/०० वा.चे दरम्यान महात्मा फुले नागरी पतसंस्था याचे कार्यालय,जय गणेश साम्राज्य,ए-विंग,ऑफिस नं.१४०, स्पाइन रोड,पांजरपोळ,भोसरी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे महात्मा फुले नागरी पतसंस्थेचे शटर कुलुप लावुन बंद असताना, कोणीतरी अज्ञात इसमाने शटरचा दरवाजा कशाचे तरी सहाय्याने अर्धवट उचकटुन त्यावाटे आत प्रवेश करुन,आतील गोदरेजचे कपाटाचे लॉक व ड्रॉव्हरचे लॉक तोडुन त्या मधील पत संस्थेच्या सभासदांना वार्षीक लाभांश वाटपासाठी भरलेली १५,५००/- रुपयेचे वेग-वेगळया रकमेची पांढ-या रंगाची ५० पाकीटासह नमुद रक्कम घरफोडी चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. जगदाळे ९०४९९८१२२१ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे १०/१८,भादविक ४१९,४२०,४०६ |
| **फिर्यादी** | प्रभा चांडगे,वय-५३,रा.वारजे,पुणे |
| **आरोपी** | प्रदीपकुमार भिकु खडके,रा.मोहननगर चिचवड,पुणे (अटक नाही) |

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** सन माहे मे-२०१४ ते मे-२०१५ रोजीचे कालावधी मध्ये फिर्यादी यांचे राहते घरी

**तपशिल** यातील नमुद इसम प्रदीपकुमार भिकु खडके याने फिर्यादी यांचे राहते घरी येवुन त्यांना शेअर्स मध्ये रक्कम गुंतविल्यास जास्त परतावा देण्याचे अमिष दाखवुन,तसेच फिर्यादी यांचे मुलीचे मेडीकल कॉलेज मध्ये ॲडमीशन घेवुन देतो व त्यांचे शेजारी राहणारे राजेश शंकर राव चौगुले यांचे भावाला सरकारी नोकरी लावुन देवुन,मिनीस्टर कोटयातुन फ्लॅट घेवुन देतो असे सांगुन,फिर्यादी व साक्षीदार यांची एकुण ६,७८,५००/- रुपयेची फसवणुक केली आहे

**त.अंमलदार** पो.उप.निरी. एस.बी.ताथवडे ९८२२६०१९६१

**५**

**पो.स्टे.गुरनं./कलम** मार्केटयार्ड पो स्टे ०६/१८,भादविक ४२०,४६५,४६७,४६८,४७१,४७४,३४

**फिर्यादी** सुभाष राठोड,वय-५९,रा.वर्तक नगर ठाणे

**आरोपी** सुनिल रामचंद्र जाधव,रा.सोपान रेसी.भोसरी,पुणे व इतर (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२२/०१/१४ ते दि.०७/०९/१७ रोजीचे कालावधीत एलआयसी हौसिंग कंपनी शिवाजीनगर व अर्बन कॉ.ऑप बँक लिमी.मार्केटयार्ड,पुणे येथे

**तपशिल** यातील नमुद इसम सुनिल रामचंद्र जाधव याने फिर्यादी यांचे मालकीची मिळकतीची बनावट खोटे दस्तऐवज तयार करुन,त्याआधारे एलआयसी हौसिंग कंपनीकडुन ४०,७०,०००/- रुपयेचे कर्ज घेऊन तसेच अर्बन कॉ.ऑप बँक लिमी.मार्केटयार्ड,पुणे या बँकेत फिर्यादी यांचे नावाने बनावट खाते उघडुन,सदर कर्जाचा चेक बँकेत जमा करुन,ती रक्कम काढुन घेऊन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. (सदरचा गुन्हा देहुरोड पो स्टे पुणे ग्रामीण येथुन पुढील तपासकामी मार्केटयार्ड पो स्टे येथे वर्ग झाला आहे.)

**त.अंमलदार** पो.उप.निरी. पाटील ९८२३५६०३६०

**६**

**पो.स्टे.गुरनं./कलम** हिंजवडी पो स्टे ०७/१८,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड)

**फिर्यादी** शुभ्रा रस्तोगी,वय-३५,रा.हिंजवडी,पुणे

**आरोपी** राजन जनार्धन शर्मा,रा.गोवा (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२१/१०/१७ रोजी १२/३० वा. ते दि.२२/१०/१७ रोजी १०/३० वा.चे दरम्यान ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील नमुद इसम राजन शर्मा याने लोकॅन्टो या वेबसाईटवर shish tuz pup या जातीच्या श्वानाचे विक्रीची जाहिरात दिल्याने,फिर्यादी यांनी त्याचेशी संपर्क साधला असता,त्याने फिर्यादी यांचेकडुन ऑनलाईन १०,०००/- रुपये घेऊन,फिर्यादी यांना सदर जातीचे श्वानाचे पिल्लु न देता,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. (सदरचा गुन्हा सायबर क्राईम येथे दिलेल्या ऑनलाईन तक्रारीवरुन दाखल केला आहे.)

**त.अंमलदार** म.पो.उप.निरी. रूपनर

**७**

**पो.स्टे.गुरनं./कलम** खडकी पो स्टे ०६/१८,भादविक १७०,४१९,४६८,४७१,३४

**फिर्यादी** एक परूष,वय-४७ वर्षे,रा.शिवाजीनगर पुणे

**आरोपी** १.जोएल फर्नांडीस २.सतीश रमेश जाधव,रा.कोहिनुर पॅलेस,शिवराम नगर,पिंपळे-गुरव,पुणे व एक महिला (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०४/०१/२०१८ रोजी ११/०२ वा. सम्राट हॉटेल वाकडेवाडी,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे सहकारी बॅंकेने केलेल्या घोटाळयाबाबत ई.डी., इनकम टॅक्स विभाग, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे, पोलीस आयुक्त,पुणे शहर व सहकार आयुक्त,पुणे यांचे कडे विविध तक्रारी अर्ज दाखल केलेल्या असुन,त्याची चौकशी चालु आहे.

यातील नमुद इसम व महिला यांनी फिर्यादी यांना आम्ही ॲन्टीकरप्शनचे अधिकारी आहेत असे खोटे सांगुन,त्यांना खोटे ओळखपत्र दाखवुन फिर्यादी यांचेकडे असलेले महत्वाचे कागदपत्रे त्यांची फसवणुक करुन त्यांचेकडुन घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. एन.व्ही.महाडीक

८

**पो.स्टे.गुरनं./कलम** येरवडा पो स्टे १०/१८,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड)

**फिर्यादी** पुष्पराज वाघमारे,वय-२० वर्षे,रा.येरवडा पुणे

**आरोपी** राजन जनार्धन शर्मा,रा.साऊथ गोवा (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१९/११/२०१७ रोजी २३/३० ते दि.२२/११/२०१७ रोजी २०/२० वा.चे दरम्यान ऑनलाईन माध्यमाव्दारे

**तपशिल** यातील फिर्यादी यांनी ऑनलाईन माध्माव्दारे श्वानाचे पिल्लु खरेदी करण्याकरिता क्विकर डॉट कॉम या वेबसाईटवरवर जाहिरात दिल्याने,फिर्यादी यांनी सिबेरियन हस्की लायब्रेडर जातीच्या श्वानाचे पिल्लु खरेदी करण्यासाठी त्याचे व्हॉटसपवर संपर्क साधला असता त्याने त्याची २२,०००/- रुपये़ किंमत सांगितली व सर्व रक्कम पे केली तर १८,०००/- रु किमतीस सिबेरिअन हस्की श्वानाचे पिल्लु भेटेल असे सांगितले. फिर्यादी यांनी १८,०००/- रुपये भिम ॲपद्वारे त्याने सांगितलेल्या त्याचे खात्यावर पाठविले असताना,सदर इसमाने कोणतेही श्वानाचे पिल्लु फिर्यादीस न देता,त्याचा नंबर ब्लॉक करुन संपर्क बंद करून फिर्यादी यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.निरी.(गुन्हे) अशोक कदम ८८८८१२०३३३

९

**पो.स्टे.गुरनं./कलम** येरवडा पो स्टे ११/१८,भादविक ४२०,४६५,४६८,४७१,३४

**फिर्यादी** छाया तांबे,वय-२५ वर्षे,रा.येरवडा,पुणे

**आरोपी** १.ओंकार राजु चौधरी २.आकाश अनिल पोटघन (अटक)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०५/०१/२०१८ रोजी सकाळी ११/३० ते १२/०० वा. येरवडा मध्यवर्ती कारागृह पुणे

**तपशिल** यातील फिर्यादी ह्या येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे महिला रक्षक म्हणुन आहेत.त्यांना येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे मुलाखत कक्षात बाहेरील बाजुस ड्युटीस असताना,यातील नमुद इसमांनी न्यायबंदी यांना भेटण्यासाठी त्याच्या भावांचे नावाचे खोटे व दोन बनावट आधार कार्ड तयार करुन,त्याचे आधारे मुलाखत नोंदणी करुन नंबर येरवडा कारागृह येथे मुलाखत कक्षात बाहेरील बाजुस अवैद्यरित्या भेट घेण्याचा प्रयत्न करुन,येरवडा कारागृह प्रशासनाची फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. आर.पी.कांबळे

१०

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोंढवा पो स्टे ०८/१८,भादविक ३५३,५०४

**फिर्यादी** पो.शि.पाटील, कोंढवा वाहतुक विभाग पुणे शहर

**आरोपी** गौरव बाबुराव यादव,वय-२७,रा.शुभम सोसा.वडगांव-शेरी,पुणे (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०४/०१/१८ रोजी १७/३० वा. पीएमटी बस स्टॉप कोंढवा,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी कर्तव्यावर हजर असताना,फिर्यादी यांनी रस्त्यावर पडलेला मोटार सायकलस्वार गौरव बाबुराव यादव,वय-२७,रा.शुभम सोसा.वडगांव-शेरी,पुणे यास रस्त्याचे बाजुला घेऊन,त्यास तुम्ही कसा काय पडला अशी विचारणा केल्याचे कारणावरुन त्याने फिर्यादी यांना अपशब्द वापरून,धक्का-बुक्की करुन ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा आणला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. लोखंडे

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**